नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १०/०९/२०२५ (बुधवार)**

## अवैधरित्या अंमली पदार्थ (एम.डी.)बाळगुन सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद २ आरोपी अटक ,कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक ०८/०९/२०२५ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फतीने खबर मिळाली की, एमआयडीसी कळमेश्वर येथील पुरूषोत्तम लॉज चा मालक नामे सचिन रोकडे हा अंमली पदार्थ एम.डी. जवळ बाळगुन त्याचे सेवन करतो. अशा खात्रीशीर बातमीवरून कळमेश्वर पोलीसांनी पुरूषोत्तम लॉज येथे छापा टाकला असता आरोपी नामे **१) सचिन पुरूषोत्तम रोकडे, वय ३५ वर्ष, रा. एमआयडीसी चौक २) मोहम्मद नियाज अंसारी, वय ३३ वर्ष, रा. नवी बस्ती टेका नाका नागपुर हे मिळुन आले.** पोलीसांनी पंचासमक्ष दोन्ही आरोपीतांची अंगझडती घेतली असता आरोपी क्रमांक १ याचे ताब्यात १.२५ ग्रॅम एम.डी आणि आरोपी क्रमांक २ याचे ताब्यातुन ०.४५ ग्रॅम एम.डी मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष एकुण १.७० ग्रॅम अंमली पदार्थ एम.डी. आणि एक ॲड्रॉईड मोबाईल असा एकुण ४५,५०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.आहे.

नमुद दोन्ही आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे एन.डी.पी.एस कायदयान्वये अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

# रामटेक येथे दिनांक १२/०९/२०२५ रोजी होणाऱ्या कृषी मेळाव्याच्या अनुषंगाने वाहतुक वळविल्याबाबत

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत रामटेक येथे दिनांक १२/०९/२०२५ रोजी कृषी मेळावा कार्यक्रम हा नेहरू ग्राउंड रामटेक येथे आयोजित करण्यात आलेले आहे. सदर कार्यक्रमामध्ये रामटेक येथील स्थानिक शेतकरी तसेच आजुबाजुच्या गावातील बहुसंख्य शेतकरी उपस्थित राहण्याची शक्यता आहे. कार्यक्रम आयोजित करण्यात करण्यात आलेले स्थळ हे हायवे लगत असल्याने वाहतुक अडथळा निर्माण होण्याची तसेच एखादा गंभीर अपघात होवून कायदा व सुव्यवस्था निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सर्वसामान्य नागरिकांची सुरक्षा व वाहतुक सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीकोणातून तसेच अपघाताची शक्यता टाळण्याच्या अनुषंगाने वाहतुकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतुकीची कोंडी निर्माण होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांकित अपघात होवू नयेत याकरीता मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशान्वये **दिनांक १२/०९/२०२५ चे सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०६.०० वा. पर्यंत** खालील प्रमाणे वाहतुक वळविण्यात आली आहे.

**तुमसर कडुन रामटेककडे येणारे जड/अवजड वाहने घोटीटोक येथुन अरोली मार्गे—निमखेडा फाटा—तुमान—निमखेडा—तारसा— कन्हान—नागपूरकडे**

**तुमसर कडुन रामटेककडे येणारे जड/अवजड वाहने घोटीटोक—पंचाळा—मांद्री—मुसेवाडी—नायबी—महाराजपुर—मुखनापूर—चोरबावली मार्गे—नागपूर ते जबलपूर हायवेकडे**

**नागपूर कडून तुमसरकडे जाणारे जड/अवजड वाहने मौदा टि पॉईंट मार्गे हमलापुरी फाटा—हमलापुरी—काचुरवाही—मसला—घोटीटोक— तुमसरकडे**

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद कोंढाळी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— दिनांक ०९/०९/२०२५ रोजी कोंढाळी पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा दुधाळा बस स्टॉप येथे नाकाबंदी केली असता स्पेलडर मोटार सायकल क्र एम एच ४० बीए ५१६१ ही येताना दिसली. वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. वाहन चालक नामे बंडु शेषराव फलके, वय ४० वर्ष रा.पांजरा गोंडी, मासोद याला अधिक विचारपुस केली असता त्याने सांगितले की तो आरोपी क्रं २. नरसिंग मुलचंद जाधव, रा. माहुरखोरा यांचे सांगितले वरून देशी दारूची वाहतुक करीत असल्याबाबत माहीती समजली. पोलीसांनी पंचासमक्ष १) २४ निपा देशी दारू किंमती ८४० /— रूपये २) स्पेलडर मोटार सायकल क्र एम एच ४० बीए ५१६१ असा एकुण किंमती ५०८४०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कोंढाळी येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०९/०९/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १०/०९/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत मरामाय नगर, अण्णाभाऊ साठे नगर, पेठ बुधवार, काळे चौक, हत्तीखाना, सावरगाव रोड,भटपुरा येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री बापु रोहोम यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. गळपुरा चौक येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर

कारवाईमध्ये पोलीस स्टेशन काटोल चे अधिकारी, अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने